# जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस

P.R.O. Office, Crime Branch, Pune City

**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001

**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police


**प्रेसनोट क्रमांक - २५ दिनांक - १७/०१/२०२२**

बिबवेवाडी पोलीस स्टेशन,पुणे शहर

## चार महिण्यांपासून फरार असलेला खुनाचे प्रयत्नातील गुंड जेरबंद

इसम नामे मयुर शंकर जगताप यांचेवर जिवे ठार मारण्याचे उद्देशाने कोयत्याने वार करुन तसेच दगड, विटांचे सहाय्याने परिसरातील वाहनांच्या काचा फोडुन लोकांमध्ये दहशत पसरवल्याने आरोपी नामे १) दिपक ऊर्फ डी उत्तम डाखोरे २) शहाबुद्दीन निजामुद्दीन मुल्ला ३) गणराज सुनिल ठाकर ४) कुणाल उर्फ मॉटी कालेकर त्यांचे विरोधात तक्रार दिल्याने त्यांचे विरोधात इकडील पोलीस ठाणेस गु.र.नं.१८०/२०२१ भा.दं.वि.क.३०७,५०४,५०६,४२७,३४ मपोका ३७(१)(३) सह १३५, क्रिमीनल लॉ अमेंडमेंट ॲक्ट ७(१), भारतीय हत्यार कायदाकलम ४(२५) अन्वये गुन्हा नोंद करुन दाखल गुन्हयामध्ये आरोपी नामे १) दिपक ऊर्फ डी उत्तम डाखोरे २) शहाबुद्दीन निजामुद्दीन मुल्ला ३) गणराज सुनिल ठाकर यांना अटक करणेत आले होते. दरम्यान आरोपी कुणाल उर्फ मॉटी कालेकर हा चार महिन्या पासुन पोलीसांना गुंगारा देत होता.

बिबवेवाडी पोलीस ठाणेकडील तपास पथक व निगराणी पथकाचे सहा.पोलीस निरीक्षक श्री प्रविण काळुखे, पोलीस उप निरीक्षक श्री यश बोराटे, स्टाफ सह असे बिबवेवाडी पोलीस ठाणे कार्य क्षेत्रामध्ये गुन्हे प्रतिबंधात्मक पेट्रोलींग फिरत असताना पोलीस अंमलदार अनिल डोळसे यांना त्यांचे बातमीदारा मार्फत माहीती मिळाली की, वरील फरारी आरोपी मॉटी उर्फ कुणाल कालेकर हा आंबामाता मंदिरा जवळ सुखसागरनगर येथे थांबला आहे. अशी माहीती प्राप्त होताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील झावरे यांच्या सुचने नुसार नमुद स्टाफ यांनी आंबामाता मंदिर, सुखसागरनगर येथे सापळा रचून त्यास शिताफीने ताब्यात घेवून त्यास त्याचे नाव पत्ता विचारता त्याने त्याचे नाव कुणाल उर्फ मॉटी कालेकर रा. व्हि.आय.टी. कॉलेज, अप्पर इंदिरानगर, बिबवेवाडी पुणे असे असलेचे सांगितले त्यास दाखल गुन्ह्याचे कामी अटक करणेत आली असून पुढील तपास पोलीस उप निरीक्षक श्री यश बोराटे हे करीत आहेत.

वरील फरारी आरोपी हा शरीराविरुध्द व मालत्तेचे विरुध्दचे गुन्हे करणारा सराईत गुन्हेगार असून तो बिबवेवाडी पोलीस ठाणेकडे वाहन चोरीच्या गुन्हयात सुध्दा सुमारे चार महिण्यांपासून फरारी आहे. तसेच सदर आरोपी विरुध्द इतरत्र पोलीस ठाणे येथे शरीराविरुध्दचे गुन्हे दाखल आहेत.

सदरची कारवाई ही परिमंडळ ५ चे पोलीस उप आयुक्त श्रीमती नम्रता पाटील, वानवडी विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. राजेंद्र गलांडे, बिबवेवाडी पोलीस ठाणेचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. सुनिल झावरे तसेच पोलीस निरीक्षक(गुन्हे) चे अनिता हिवरकर यांचे मार्गदर्शनाखाली सहा.पोलीसनिरीक्षक श्री प्रविण काळुखे, पोलीस उप निरीक्षक श्री यश बोराटे, पोलीस शिपाई अनिल डोळसे,शिवाजी येवले, दैवत शेडगे यांनी केली आहे.


बिबवेवाडी पोलीस स्टेशन, पुणे शहर
तपास पथक